सकाळ

# वारकऱ्यांकडून सायबर सुरक्षेचा संदेश

■ सकाळ वृत्तसेवा

मुक्ताईनगर, ता. २५ : आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त संत मुक्ताबाई मंदिर परिसरात एक आगळावेगळा सायबर जनजागृती उपक्रम पार पडला. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या ''स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्स'' येथील क्विक हील सायबर वॉरियर क्लब, क्विक हील फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर पोलिस यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वारकरी परंपरा व आधुनिक डिजिटल सुरक्षेची सुरेख सांगड घालत राबवलेल्या या उपक्रमाने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले.




**मुक्ताईनगर :** सायबर वारकरी जनजागृतीपर यात्रेत पारंपरिक वेशभूषेत सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनी.

विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेत ''सायबर वॉरियर्स'' या उपक्रमात स्कूल ऑफ कॉम्प्युटर सायन्सच्या २० सायबर वॉरियर्सनी पारंपरिक वारकरी वेशभूषेत उत्साहाने भाग घेतला. एका विद्यार्थ्याने भगवान श्री विठ्ठल तर एका विद्यार्थिनीने माता रुक्मिणी यांची वेशभूषा साकारून वारकरी संप्रदायाचे नयनरम्य दर्शन घडविले. ''सायबर वारकरी'' या अभिनव संकल्पनेतून विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेचे संदेश देणारे पोस्टर्स, फलक व विशेष कॅप्स परिधान करून परिसरात प्रबोधन केले. जनजागृती अधिक प्रभावी करण्यासाठी सायबर सुरक्षेवर आधारित प्रश्नोत्तरे, छोटेखानी खेळ व संवादात्मक उपक्रम राबविण्यात आले. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनीच यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या अभिनव उपक्रमाद्वारे ५००हून अधिक वारकरी व भाविकांपर्यंत सायबर सुरक्षेचा संदेश पोहोचविण्यात आला. परंपरा, संस्कृती व तंत्रज्ञानाचा सुंदर संगम घडवीत विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. भविष्यातही अशाच सर्जनशील उपक्रमांद्वारे व्यापक जनजागृती करण्याचा संकल्प ''क्विक हील सायबर वॉरियर क्लब''च्या वतीने व्यक्त करण्यात आला.

## पथनाट्यातून प्रबोधन

■ आषाढी एकादशीनिमित्त आलेल्या तीन वेगवेगळ्या पालख्यांसमोर विद्यार्थ्यांनी प्रभावी पथनाट्य व नृत्य सादर केले. मनोरंजनातून प्रबोधन करीत विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. बनावट लिंक्स व क्युआर कोडचे धोके, बँक खात्याची गोपनीय माहिती शेअर न करण्याचे आवाहन करण्यात आले. सोशल मीडियाचा सुरक्षित वापर करताना डिजिटल व्यवहार करताना घ्यावयाची काळजी, याबाबतही जागृती करण्यात आली. या कार्यक्रमातदरम्यान सायबर वॉरियर्सनी थेट वारकऱ्यांशी संवाद साधून मोबाईलचा सुरक्षित वापर व सायबर गुन्हे टाळण्यासाठी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. भाविकांना सायबर सेफ कार्ड्सचे वाटप करण्यात आले. यात सायबर सुरक्षेच्या महत्त्वाच्या टिप्स, खबरदारीचे उपाय व आपत्कालीन सायबर हेल्पलाइनची माहिती देण्यात आली आहे.